॥ ॐ ॥

मे
२०२४

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त


२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org


## १३ मे – ‘स्व’-रूपवर्धिनीचा ४५ वा वर्धापनदिन





“निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुनी हाती
व्रतस्थ होऊनि व्यापुनि टाकु विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू”


**अशा प्रेरणेने वर्धिनीची वाटचाल चालू आहे.**


# वर्षारंभ उपासना व प्रबोधन




दरवर्षीप्रमाणे गुढीपाडव्याच्या दिवशी, वर्षारंभ उपासना कार्यक्रम ओंकारेश्वर मंदिरात झाला. प्रसन्न वातावरणात सामूहिक उपासना झाली. ओंकारेश्वर मंदिराचा संपूर्ण गाभारा कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने गच्च भरला होता. उपासनेतून सामाजिक कामासाठी जो शक्ती संचय करण्यात आला त्याला योग्य कार्यदिशा ठरवण्यासाठी ज्येष्ठ संघ प्रचारक मा. गिरीशजी कुबेर यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी समाजातील कुप्रथा व त्यावर केलेले सामाजिक बदलाचे काम यावरील विविध उदाहरणे, संघटनेतील कार्यकर्त्यांचे महत्त्व, कार्यकर्ता कसा जपावा, हिंदूंचे संघटन करून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत कसे पोहचता येईल याबाबत मार्गदर्शन केले. शाखा विभागप्रमुखपदी सुरेश पवार व युवा विभागप्रमुखपदी राज जाधव यांची पुढील वर्षासाठी नियुक्ती झाली. प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.





# चला रक्तदान करूया.




दरवर्षीप्रमाणे यंदाही महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त शहरातील विविध सेवावस्त्यांमध्ये (घोरपडे पेठ, मंगळवार पेठ, बिबवेवाडी, धनकवडी, कर्वेनगर आणि पांडवनगर) रक्तदान शिबिरे आयोजित केली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना आणि बुद्धवंदना होऊन रक्तदान शिबिरांची सुरुवात करण्यात आली. शिबिरात सर्व मिळून एकूण ३८१ रक्तदात्यांचा सहभाग होता. ज्यात (१) रामकृष्ण, वर्धिका युवती विभाग आणि वर्धिनी सर्व प्रकल्प व विभाग : ७३ (२) स्वामी श्रद्धानंद शाखा : ३० (३) स्वामी दयानंद सरस्वती शाखा, स्वामी अखंडानंद शाखा : ७९ (४) धर्मवीर शंभुराजे शाखा, धर्मवीर शिवानंद शाखा, प्रयत्न शाखा : ५० (५) राजर्षी शाहू महाराज शाखा : ५१ (६) स्वामी विवेकानंद शाखा : ३१ (७) स्वामी अभेदानंद शाखा : ६७ असा सहभाग होता.





**आम्ही चालवू हा पुढे वारसा...**
यंदा वर्धिनीचे कोषाध्यक्ष श्री. विलास कुलकर्णी यांचे १०० वे रक्तदान पूर्ण झाले. यातून अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा नक्कीच मिळाली.



## एक जयंती अशीही

वर्धिनीच्या आजोळ आणि निवेदिता शाखेच्या कार्यकर्त्या ॲड. भाग्यश्री बोरा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शिरूर येथे कल्याणी सखी ग्रुपचे 'Justice for Women' या विषयावर पथनाट्य लिहिले, बसवले आणि सादर केले. या कार्यक्रमानंतर शिरुरच्या ॲड. दिलीप कांबळे यांनी उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त केली ती अशी...
ज्ञ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीचे औचित्य साधुन या शुभदिनी आपण आपले महिला सहकारी यांना सोबत घेऊन एक सामाजिक शैक्षणिक तसेच महिलांविषयक प्रश्न समस्या आणि कायदे हे सारं आपण आपले पथनाट्याद्वारे सादर करून उत्कृष्ट असं प्रबोधन केलंत. सामुहिक स्नेहभोजनाचा आस्वाद घेत अन्नदान आणि ज्ञानदान यांचा सुरेख असा राजस आहार आज सर्व समाजबांधवांना मिळाला. तुमची सर्व महिला टीमने आपली कौटुंबिक जबाबदारी कर्तव्य सांभाळून सामाजिक जाणिवेतून अनेक दिवसांचे अथक प्रयत्नांतून, रिहर्सल करुन एक छान असा पथनाट्याचा हा प्रयोग प्रथमच या उद्यानात सादर झाला. लोकांना तो नक्कीच भावला, आवडला. शेवटी समाज म्हणजे एक घोळका असतो, गर्दी असते. पण सातत्याने समाजाला दिशा देणारी तुमच्यासारखी सदविचारी माणसं स्वतःला घडवता घडवता समाजालाही घडवतात.''

## महिला विभाग : बचतगट - कार्यशाळा

बचतगटातील महिलांसाठी दि. १९ एप्रिलला सौ. सरोजताई भडभडे यांनी 'जीवनविकास' या विषयावर कार्यशाळा घेतली. बौद्धिक खेळातून सुरुवात झाली आणि त्यातून नवीन महिलेशी प्रत्येकीची ओळख झाली. नंतर झालेल्या मुक्त संवादातून स्वतःमधील गुणांची, कौशल्यांची जाणीव, आत्मविश्वास वाढवणे, सकारात्मक दृष्टिकोन कसा ठेवावा यावर चर्चा झाली. आपल्या स्वप्नांची पूर्ती करायची असेल तर रोजच्या ताण-तणावांवर नियंत्रण ठेवून मनाचे आरोग्य सांभाळणे महत्त्वाचे आहे. यासाठी आपल्या जवळच्या व्यक्तीबरोबर मनमोकळा संवाद असणे गरजेचे आहे. या गोष्टी सर्वांच्या लक्षात आल्या.

# पाकोळी बालवाडी - अभ्यास दौरा

अनेक सामाजिक संस्था वेगळ्या विचाराने विविध क्षेत्रात कार्यरत असतात, अशांची ओळख संस्था भेटीतून होत असते आणि आपणही अनुभव समृद्ध होऊन कार्यरत राहणे, आवश्यक असते. अशा उद्देशाने बालवाडी शिक्षिकांचा अभ्यास दौरा १८ - १९ मार्चला नाशिकला झाला. यातील काही विशेष –

◆ राणी लक्ष्मीबाई भवन - राष्ट्रसेविका समितीची १९५८ पासून कार्यरत असलेली ही वास्तू आहे. प्रवेश करतानाच अष्टभुजा देवी आणि राणी लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमा बघून मन प्रसन्न होते. पूर्णवेळ कार्यकर्त्या श्रीमती शुभांगी ताई कुलकर्णी यांनी कार्यालयाची संपूर्ण माहिती सांगितली. एक दिवसाच्या निवासात सर्वांनी माहेरपणाचा आनंद घेतला .

* उद्योग मंदिर - नाशिकजवळील आदिवासी महिलांनी बनवलेले टिकाऊ अन्नपदार्थ, सणांना लागणारे पूजा साहित्य, दिवाळी फराळ, राख्या इत्यादी विक्री येथे होते आणि त्यामुळे आदिवासी महिलांना उत्तम रीतीने अर्थार्जन होते.

* अंकुर विद्यामंदिर- 'मुलांनी बालवाडीत येताना हरणासारखे उड्या मारत यावे आणि कासवासारखे घरी जावे', 'तीन तास पाटी, पेन्सिल शिवाय शाळा' अशा आगळ्यावेगळ्या उद्देशाने चालणारी ही बालवाडी. शाळा बघताना भिंतीवर काढलेली काढलेले प्राणी पक्षी, भारताचा नकाशा, व कलेचे साहित्य लक्ष वेधून घेत होते. विद्याभारती व संघ कार्यकर्ते श्री. सदाशिव उपाले सरांशी नवीन शैक्षणिक धोरण व बालवाडी याविषयी माहितीपूर्ण चर्चा झाली.

◆ आनंद निकेतन शाळा - अभ्यास दौऱ्यातील ही विशेष स्थळ भेट होती. तेथील ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती शोभनाताई भिडे व शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना दौड यांच्याशी झालेल्या संवादातून शाळेची वाटचाल लक्षात आली. बालवाडी ते दहावीपर्यंत शाळेत वर्ग आहेत. प्रत्येक वर्गात २० विद्यार्थी आणि उपक्रमातून शिक्षण हे शाळेचे वैशिष्ट्य जाणवले. बाल मेळावा, गोष्ट सांगून त्यावर चित्र काढणे-रंगवणे कार्यशाळा, वाचन वर्ग, पालकांचे निवासी शिबिर, उपलब्ध साहित्यातून वस्तू निर्मिती कार्यशाळा, फळबाग भेट यात खरेदी ते कापणे याचे शिक्षण, डॉक्टर, भाजी विक्रेते, दूध विक्रेते अशा दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या व्यावसायिकांशी शाळेत संवाद असे अनेक वेगवेगळे उपक्रम शाळेत घेतले जातात. यातून प्रत्येक विद्यार्थी अनुभवातून, कृतीतून शिकत असतो हे जाणवले.

◆ श्री गुरुजी रुग्णालय - रुग्णांच्या सेवेबरोबर समाजसेवा कशी करावी याचे हे उत्तम उदाहरण आहे. डॉ. नागेश कुलकर्णी यांनी संपूर्ण रुग्णालय दाखवून त्यांची वैशिष्ट्ये सांगितली.

* पूर्णवेळ असणारे २५ डॉक्टर - सर्व आजारांवर अल्पदरात उपचार

* पंचकर्म व इतर आयुर्वेदिक उपचार ही उपलब्ध

* कॅन्सरवरील सर्व उपचार पद्धती उपलब्ध तसेच कॅन्सर रुग्णांच्या नातेवाईकांसाठी निवासाची व्यवस्था

* सेवा संकल्प समिती - परिसरातील पाड्यांवरील महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे, आदिवासी बांधवांसाठी किशोरी प्रकल्प, सेंद्रिय शेती, ठिबक सिंचन, आरोग्यसेवा, शासकीय योजनांची माहिती, जलप्रकल्प, निसर्ग मित्र प्रकल्प, सेवा, आत्मियता व पारदर्शकता यातून हे कार्य चालू आहे. या सेवा प्रकल्पांची प्रेरणा 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामातून मिळाली. या त्यांच्या उद्गारामुळे वर्धिनीच्या कामाचा खूप अभिमान वाटला.

◆ शंकराचार्य न्यास संचालित मोरोपंत पिंगळे गोशाळा - गोशाळेचे व्यवस्थापक श्री. राकेश राय व अन्य कार्यकर्ते यांच्याशी झालेल्या संवादातून गोशाळेच्या कामाचे स्वरूप समजले. ३ गाईंपासून सुरुवात झालेल्या गोशाळेत आता ६० गाईंची काळजी घेतली जाते.

परतीच्या वाटेवर 'सोमेश्वर'चा धबधबा आणि शंकराचे दर्शन झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी काळाराम मंदिरात रामाचे दर्शन आणि काकड आरती झाली. मंदिरात उपासना व रामरक्षा पठणाने वेगळी ऊर्जा घेऊन पुढील प्रवास सुरू झाला.

दुपारचे जेवण वर्धिनीच्या रुग्ण सहाय्यक वर्गाच्या शिक्षिका सौ. नंदाताई यांच्याकडे झाले.

◆ त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांचे जन्मस्थान भगूर येथील त्यांचा वाडा हे प्रेरणादायी स्मारक बघितले. शेणाने सारवलेल्या जमिनी, लाकडाचे जिने, भुयार, चोर वाटा, धान्याची भिंतीतील कोठारे आणि सर्वत्र लावलेली सावरकरांच्या जीवनातील प्रसंग चित्र प्रदर्शनी यातून सावरकरांचे जीवन चरित्र उलगडते. या पवित्र ठिकाणी जयोस्तुते... हे पद्य सादर करून सावरकरांना अभिवादन केले. दौऱ्याचा शेवट प्रेरणादायी आणि स्मरणीय झाला.








'ताई दादाची शाळेत परीक्षा आहे तर आमची का नाही ?' या आग्रहाखातर मार्चच्या अखेरीस तीनही गटात तोंडी परीक्षा झाल्या. 'उद्या कोणता पेपर ? मी आज सर्व गाणी म्हणून दाखवली. मी गोष्ट सांगितली. मी अंक सांगताना चुकलो नाही,' असा संवाद पालकांबरोबर मुलांचा घरी जाताना असे. मोठ्या गटातील मुलांनी जीवन व्यवहाराची परीक्षा देताना सर्व मुलांसाठी ओली भेळ केली. यात चिरणे, किसणे, निवडणे, एकत्र करणे, चवी सांगणे, वाढणे याचा आनंद मुलांनी घेतला. शाळेतला शैक्षणिक वर्षातला शेवटचा सण गुढीपाडवा उत्साहात साजरा झाला.

दि. १० एप्रिलला छोटा व मधल्या गटातील मुलांना प्रगतीपुस्तक दिले. पालकांनी व मुलांनी 'गुजर आईस्क्रीम' यांनी दिलेल्या आईस्क्रीमचा आस्वाद घेतला. वर्षभर केलेले साहित्य घरी नेण्यासाठी मुलांनी पालकांच्या मदतीने सुंदर पिशव्या करून आणल्या आणि त्या एकमेकांना दाखवताना 'माझीच खूप छान' असे सांगत होती. काही पालकांनी 'झाडे लावा, झाडे जगवा', 'पाणी वाचवा', 'पाण्याचा योग्य वापर काळजीपूर्वक करूया' असे संदेश पिशव्यांवर लिहिले होते. पुढच्या वर्षी नवीन वर्गात जाणार याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

**शुभेच्छा समारंभ व निवासी शिबिर -** मोठ्या गटातील मुले पहिलीत दुसऱ्या शाळेत जाणार म्हणून त्यांचे दि. १२ व १३ एप्रिल निवासी शिबिर झाले. 'स्वावलंबन' शिबिराचे उद्घाटन भावे प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिभा गायकवाड व सहशिक्षिका सौ. कुलकर्णी, सौ. भावसार यांच्या हस्ते झाले. त्यांनी मुलांना गोष्टी सांगितल्या आणि शुभेच्छा दिल्या. मुलांचे राघव, रघुनंदन, रघुनायक, रघुपती असे चार गट पाडल्यानंतर आपल्या वर्गात सर्वांनी सामान ठेवले. दुपारच्या जेवणानंतर सगळ्यांनी कागदाची पाकीटे तयार केली. ही पाकीटे चित्रांनी सजवली आणि संध्याकाळच्या पर्वती सहलीला तयार झाली. आरोळ्या, गाण्यांच्या गजरात सर्वजण पर्वती चढले. पर्वतीवर शंकरांचे दर्शन घेऊन, बाकी सर्व परिसर फिरून आल्यावर गोलात संध्याकाळचा परिपाठ झाला. श्लोक, भजन म्हणून आणि पर्वतीची माहिती ऐकून सर्वजण वर्धिनीत परतले. रात्रीच्या जेवणानंतर गाणी, गोष्टी ऐकत झोपून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वाजता उठून सर्वजण आवरून ओंकार सभागृहात व्यायामाला जमले. गटशः मनोरंजनात्मक खेळांच्या स्पर्धा झाल्या. न्याहारीनंतर शिवाजी महाराजांच्या चरित्रावर प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. पपेट शो झाला. मुलांनी कागदाचा अननस बनवला. त्यानंतर सहभोजनाचा आनंद घेत समारोपाची तयारी सुरू झाली. सौ. संध्याताई झोपे समारोपाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते सर्व मुलांना बक्षीसे देण्यात आली. श्री. आढाव, सौ. तटकरे, सौ. घोलप, सौ. भालसे या पालकांनी मनोगत व्यक्त केले.


सौ. संध्याताईंनी पालकांना गोष्टीतून मार्गदर्शन केले. सर्व उपक्रमांचे आणि सर्व शिक्षिकांचे मनापासून कौतुक केले आणि मुलांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. त्या म्हणाल्या, 'शाळेत झालेल्या संस्कारांना तुम्ही खतपाणी घाला. मुलांशी गप्पा मारा. त्यांना भरपूर खेळू द्या आणि अपेक्षांचे ओझे त्यांच्यावर घालू नका.'

मुलांना प्रगतीपुस्तक देताना शिक्षिकांची एका डोळ्यात हसू तर दुसऱ्यात अश्रू अशी समाधानाची भावना दिसत होती. आम्ही सगळे बालशाखेत येऊ आणि भेटत राहू असे आश्वासन पालकांनी शिक्षिकांना दिले आणि आनंदात, उत्साहात मुले घरी परतली.









# अभिनंदन

◆ श्री तांबडी जोगेश्वरी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने 'सेवाव्रत गौरव पुरस्कारा'ने 'स्व'-रूपवर्धिनीस सन्मानित करण्यात आले.




◆ प्रभातच्या नारी शक्ती सन्मानाने वर्धिनीच्या कार्यकर्त्या सौ. शुभांगीताई तांबट यांचा गौरव करण्यात आला.




◆ केअर टेकर्स सोसायटी, पुणे कँप, या संस्थेतर्फे महिला दिनाच्या निमित्ताने युवती विभागाच्या कार्यकर्त्या श्रीमती सुरेखाताई माळी यांचा सन्मान करण्यात आला.

◆ स्वामी अखंडानंद शाखेचे कार्यकर्ते आणि आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक, डॉ. उमेश बिबवे यांची महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या आजीव सभासद (Life Member) पदी निवड.



◆ संग्राम दशभुजा गणपती मंडळातर्फे सामाजिक कार्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनीचा सत्कार करण्यात आला. वर्धिनीच्या वतीने महिला विभाग प्रमुख श्रीमती मंजुषाताई कुलकर्णी यांनी सत्कार स्वीकारला.

# उत्थान विभाग

• ७ एप्रिल रोजी अभ्यासिका प्रमुखांचे 'वेळेचे नियोजन' (time management) या विषयावर प्रशिक्षण घेण्यात आले.

• १३ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त पीएमसी कॉलनी, कागदीपुरा, बुद्ध विहार येथे घेऊन संविधान विषयावर कार्यक्रम झाला. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे श्री. अमित कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची थोडक्यात चरित्र मांडणी केली. अभ्यासिकेतील मुलांनी संविधानावर विविध घोषवाक्य तयार करून त्याचे वाचन केले. उपस्थित संख्या – ८०

• १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बाबासाहेबांचे विचार पुस्तक रूपाने प्रत्येक घरात जावेत आणि ते वाचले जावेत यासाठी वस्ती-वस्तीत पुस्तक विक्री झाली. वस्तीतील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

• २६ ते २८ एप्रिल या कालावधीत विभागाच्या किशोरी गटाच्या सर्व मुली निरामय शिबिरात सहभागी झाल्या.

• या महिन्यातील विशेष बाब म्हणजे मुलांना 'वीर सावरकर' चित्रपट आणि बालगंधर्व नाट्यमंदिर येथे 'झंप्या' हे नाटक दाखविण्यात आले.









# शाखा विभाग - उन्हाळी शिबिर

कलेची दुनिया असते किती न्यारी । कल्पनाशक्ती घेत मारू भरारी ।। नव्या कल्पनांना जागृत करू या । चला नवं काहीतरी करून पाहू या ।। असं म्हणत शाखा विभाग वर्धकांचे शिबिर संपन्न झाले.

**लहान गटाचे शिबिर २४ ते २८ एप्रिल या कालावधीत न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे पार पडले.**

वर्धिनीच्या प्रथेप्रमाणे उपासना आणि प्रबोधनाने दिवसाची झालेली सुरुवात विविध कृतीसत्र प्रेरणासत्रांच्या मेजवानीत रात्र कार्यक्रमाच्या मनोरंजक सत्राने संपायची. शिबिराचा विषय कला असल्याने कृतिसत्रांची पेरणी करण्यात आली. यामध्ये वादनकलेत डफ व पेटीवादन अभिनय, कॅलिग्राफी, मूर्तीकाम, चित्रकला, ओरिगामी अशा बहुआयामी कलांची ओळख वर्धकांना या निमित्ताने झाली.

याशिवाय दररोज संध्याकाळी कला विषयावर आधारित निवडक गोष्टींचे प्रदर्शन मांडले जायचे. यामुळे वर्धकांना अनेक नवीन गोष्टी पहायला मिळाल्या.

प्रेरणासत्रात श्री. निलेश धायरकर यांनी झोप ही विनोदी कथा, श्री. सुरेश पवार यांनी जोनायन पक्षाची गोष्ट तर अमृत सामक यांनी प्रेरणादायी कथा मुलांना सांगितल्या.

रात्रकार्यक्रमात चित्रपट, नाटक यासोबतच जादूचे प्रयोग मुलांना दाखवण्यात आले.

मैदानात मनोरा, लंगडी, डोळ्यावर पट्टी बांधून गटशः कृती करणे, स्वच्छता अशा शारीरिक ताकत आणि कसब वाढविणाऱ्या स्पर्धा घेण्यात आल्या. विशेष बाब म्हणजे शिबिरात मौन भोजनाचा प्रयोग करण्यात आला. शिवाय दररोज भोजन फळा लिहून अन्न वाया जाणार नाही यासाठीचे सुविचार लिहिले जात होते. शिबिरात आवर्जून तीन गोष्टींवर भर देण्यात आला. ठिकठिकाणी पाणी वाचवा, विजेचा वापर कमी करा, ओला व सुका कचरा वेगळा करा असे तक्ते लावण्यात आले आणि याचा परिणाम म्हणून मुले न सांगता या गोष्टी आचरणात आणू लागली.

कलेच्या अविष्कारापासून कचऱ्याच्या व्यवस्थापनेपर्यंत प्रत्येक गोष्टीत कला आहे आणि त्या दृष्टीने बघितले तर जगण्यात वेगळा आनंद आहे याचा प्रत्यय शिबिरात आला.







**वर्धक विभाग मोठ्या गटाचे शिबिर दि. १९ ते २४ एप्रिल कालावधीत न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग येथे संपन्न झाले.**

अभिनय क्षेत्रातील यशस्वी कलाकार आणि वर्धिनीचे युवक अभिनेते श्री. श्रीकांत यादव यांच्या कला क्षेत्रात यशस्वी कसे व्हावे या विषयावर आधारित उद्घाटन सत्राने शिबिराची अतिशय उत्साहात सुरुवात झाली. सकाळच्या उपासनेनंतर वर्धकांच्या शांत झालेल्या मनावर काही विशेष व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडावा यासाठी विशेष व्यक्ती चरित्र परिचय प्रबोधनात करून देण्यात आला.

किरण ननावरे यांनी पंडित भीमसेन जोशी व त्यांचे गुरु सवाई गंधर्व यांची माहिती सांगितली. प्रसाद दासरी याने श्री. सुधीर फडके यांची, आदित्य घोटवडे याने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या लेखनकलेची ओळख तर हनुमान मेकडे यांनी पु. ल. देशपांडे यांचे कला क्षेत्रातील योगदान तर प्रणव पोळ याने लिओनार्दो द विंची या महान मूर्तीकार चित्रकाराची माहिती वर्धकांना दिली.

कृतीसत्रामध्ये डफ व हार्मोनियम वादन, शॉर्ट फिल्म मेकींग, अभिनय, मूर्तीकला, चित्रकला अशा कलांचा प्रत्यक्ष अनुभव वर्धकांनी घेतला. नवीन गोष्टी आत्मसात केल्या.

प्रेरणा सत्रामध्ये श्री. मोहन शेटे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर, श्री. रामकृष्ण चिंचकर यांनी श्री. हेडगेवार, श्री. संदीप मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर श्री. भालचंद्र पुरंदरे यांनी शिवरायांच्या अपरिचित कथा या विषयांवर कथारुपात चरित्र मांडणी केली.

रात्र कार्यक्रमात भारुड सादरीकरण, शाहीर श्रीकांत शिर्के यांचे पोवाडा सादरीकरण, पद्यमंजुषा असे उपक्रम झाले.

बौद्धिक खुराकासोबतच मुलांनी मैदानात कसून घाम गाळला. व्यायामासोबतच कबड्डी, दंडरिंग, खजिना युद्ध अशा स्पर्धा घेण्यात आल्या.

अतिशय भारावलेल्या उत्साही वातावरणात संपन्न झालेल्या या शिबिराचा समारोप श्री. संजय तांबट आणि श्री. योगेश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. संपूर्ण शिबिर कालावधीत मुलांनी आत्मसात केलेल्या कला जसे शॉर्ट फिल्म, वादन, पथनाट्य, मूर्तीकला, चित्रकला यांचे सादरीकरण होऊन शिबिर सांगता झाली.







**वर्धिका विभाग - वर्धिका गटाचे शिशुविहार एरंडवणे येथे दि. २४ ते २८ एप्रिल या कालावधीत छत्रपती शिवराय या विषयावर शिबिर संपन्न झाले.**

आठवडाभर आधी मुलींनी सराव करून बसविलेल्या शिवरायांच्या जीवनावर आधारित नाट्य सादरीकरणाने वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. अरविंद केळकर व श्रीमती पुष्पाताई नडे यांच्या उपस्थितीत शिबिराची सुरुवात झाली. शिबिरात सकाळ-संध्याकाळ दणकून मैदानी खेळ झाले. तसेच शिवपुस्तिका बनवणे, नृत्यातून पलंग मांडणी, किल्ला बनवणे, शिवमंजुषा (प्रश्नमंजुषा) अशा कृतीसत्रांतून शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडत गेले. शिवाजी महाराज हे केवळ वाचनात बोलण्यात नाही तर प्रत्यक्ष कृतीत आचरणात असायला हवेत याची जाण शिबिरार्थींना आली.

















# ‘स्व’-रूपवर्धिनीची पंचेचाळीस वर्षे !

**जवळपास स्थापनेपासून वर्धक, वर्धिका आणि कार्यकर्त्यांना नव्या नव्या उपक्रमांतून प्रेरणा देणारे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. प्रदीप आगाशे सर यांनी संस्थेच्या ४५ व्या वर्धापन दिनानिमित्त व्यक्त केलेल्या भावना त्यांच्याच शब्दात.**

१३ मे १९७९, ‘स्व’-रूपवर्धिनीचा स्थापना दिवस! स्व. किशाभाऊ पटवर्धन यांनी एक स्वप्न पाहिलं होतं! समाजातील - विशेषतः अविकसित भागात शैक्षणिक गुणवत्ता, संस्कार, सेवावृत्ती, राष्ट्रभक्ती, रुजविण्याचं! तसे एका शाळेतून मुख्याध्यापक म्हणून निवृत्त होण्यापूर्वी किती तरी वर्षे किशाभाऊ ह्या स्वप्नातच रमायचे! सुशिक्षितांच्या दृष्टिकोनातून झोपडपट्ट्यांमधील मुलं म्हणजे सतत एकमेकांना शिव्या देणारी, मारामारी करणारी अशी वाया गेलेली असतात. पण याही वातावरणात चुणचुणीत, गुणी आणि प्रतिभावान मुलं असतात हे किशाभाऊ जाणून होते. अशा मुलांचा शोध घेऊन त्यांनी त्यांना एकत्र केलं आणि त्यांचं जीवन बदललं!

या मुलांना त्यांनी आपली लेकरं समजून त्यांना घडविलं ! मुलं गुणवत्तेत अग्रेसर ठरली. त्यांच्या मनात संस्कार रुजवले! खरं तर आपण पालकही आपल्या मुलामुलींच्याकडून रोज भक्तिभावानं अशी आगळीवेगळी प्रार्थना म्हणून घेतली नसेल ! स्वतःसाठी, स्वतःच्या कुटुंबीयांच्यासाठी परमेश्वराकडे प्रार्थना करणारे खूप असतील. त्यातही आर्तता किती असेल, ते ज्याचं त्यालाच माहीत. परंतु येथील मुलं रोज खेळ, अभ्यास असं झाल्यावर म्हणतात ही प्रार्थना ! अर्थ समजून.

नमस्कार देवा, तुला आमचा हा ।
करी आमची मायभूमी महा... (धृ.) ।।

ही मायभूमी देवानं महान करावी, आम्ही प्रार्थना करुन मोकळे होणार, असा यात भाव नाही. त्यासाठी आम्ही काय करणार ? हे पुढील कडव्यात आहे.

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासूनी
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासूनी
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा...

ह्यासाठी आम्ही या जन्मात तर समाजासाठी काम करुच; परंतु पुढच्या जन्मातही ह्याच भूमीत जन्म घेऊ आणि आमचं जीवन मातृभूमीसाठी समर्पित करू.

पुन्हा जन्म घेऊ,
स्व राष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूच साक्षी रहा.

केवढा हा समाजसेवेचा संस्कार! परंतु यासाठी आम्ही नको कां विकसित व्हायला? समर्थ व्हायला? म्हणुनच ‘विकसित व्हावे, अर्पित होऊन जावे’ हे बोधवाक्य रुजवलं! ही सर्व मुलं ही प्रार्थना जगली ! स्वतः गुणवंत झाली आणि त्यांनी समाजसेवेचाच ध्यास घेतला! किती खोलवर रुजवले गेले हे संस्कार!

‘समान शीले व्यसनेषु सख्यम्’ या उक्तीप्रमाणे मग यासाठीच वाहून घेण्याचं व्रत घेतलेले पु. ग. वैद्य, राजाभाऊ लवळेकर, प्र. ल. गावडे, रा. प. देसाई आणि अशी आणखी किती तरी व्यक्तिमत्त्व एकत्र आली. सर्वांगीण विकास, खेळ, संस्कार यानं परिसर भारावला. मुलांच्या माध्यमातून माता, घर, परिसर, वस्ती सुधारण्याचा एक आगळावेगळा प्रयोग!

आधी बीज एकले,
बीज अंकुरले, रोप वाढले
एका बीजापोटी
तरू कोटी कोटी
जन्म घेती सुमने फळे

आणि बघता बघता ‘स्व’-रुपवर्धिनी स्थिरावली ! शाखा वाढल्या ! वर्धक वाढले ! वर्धिनी सर्व आयामांनी, सर्व दिशांना विस्तारली !

बऱ्याच ठिकाणी ती व्यक्ती गेली की संस्थेला उतरती कळा लागते. परंतु इथे वर्धिनीत तयार झालेल्या युवकांनीच ‘आपणासारिखे करिती तात्काळ’, या उक्तीप्रमाणे अनेक युवक तयार केले. युवतींची शाखा झाली. आज किशाभाऊंच्या नंतरही हे विस्तारलेलं आणि समाजाला आधारभूत वाटणारं रुप पाहून किशाभाऊंना आणि त्या सर्व समर्पित विभूतींना धन्य वाटत असेल ! ‘स्व’-रुपवर्धिनीच्या या विस्तारित रुपाला त्रिवार दंडवत !

- मो. : ९५४५९४९६५५

# स्नेहमेळावा

१३ मे, वर्धिनीचा वर्धापनदिन. या निमित्ताने सर्व आप्तस्वकीयांचा स्नेहमेळावा दि. १९ मे ला वर्धिनीत आयोजित करण्यात आला. वर्धिनीच्या आजपर्यंतच्या वाटचालीत अनेक हितचिंतक, देणगीदार, संस्था प्रतिनिधी आणि माजी वर्धक-वर्धिका यांचा मोलाचा सहभाग आहे. या सर्वांनी स्नेहमेळाव्यात येऊन अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. सध्या वर्धिनीत नव्याने सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती घेतली आणि या संवादातून वर्धिनीत कार्यरत असलेल्या अनेक नवीन कार्यकर्त्यांशी त्यांची ओळख झाली. विशेष म्हणजे वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. सुनिल कुलकर्णी यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त (विज्ञान तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा उपक्रमाचे पालक), श्रीमती सुगंधा कबीर (साक्षरता वर्ग शिक्षिका) यांचा ८१ व्या वाढदिवसानिमित्त ज्ञानप्रबोधिनीचे संचालक श्री. गिरीशराव बापट यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उपस्थितांची संख्या ८०० च्या वर होती.